Literacy for a Billion

Movie: Jigar
Year: 1998

Song: Chimukalya paulanchi
Lyricist: Pravin Davane

चिमुकल्या पाऊलांची चाहूल ही कानी येई
चिमुकल्या पाऊलांची चाहूल ही कानी येई
चिमणा पाहुणा
चिमणा पाहुणा येईल ह्या घरी
हो हो हो
चिमुकल्या पाऊलांची चाहूल ही कानी येई
चिमुकल्या पाऊलांची चाहूल ही कानी येई
चिमणा पाहुणा
चिमणा पाहुणा येईल ह्या घरी
चिमुकल्या पाऊलांची

मुके घर बोलणार
मुके घर बोलणार पाळणा हा झुलणार
कान्हा गं गोकुळीचा अंगणात रांगणार
जीवाचा दिवा होई
बोबड्या बोलाची गं उमले जाई जुई
बोबड्या बोलाची गं उमले जाई जुई
चिमणा पाहुणा
चिमणा पाहुणा येईल ह्या घरी
हो हो
चिमुकल्या पाऊलांची

होवो तो रामावाणी
होवो तो रामावाणी
शूर शिवबाच्यावाणी झेप घेवो गरूडाची
दृष्ट ना लावो कोणी साकडे अंबाबाई
जपूनी दोन जीवा सांभाळ सये बाई
जपूनी दोन जीवा सांभाळ सये बाई
चिमणा पाहुणा
चिमणा पाहुणा येईल ह्या घरी
हो हो
चिमुकल्या पाऊलांची
चिमणा पाहुणा
चिमणा पाहुणा येईल ह्या घरी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*